**Q. P. Code: 28946**

वेळ : २ तास                                                                                    गुण : ६०

सूचना : (१) **सर्व प्रश्न** सोडविणे **आवश्यक**.

(२**) सर्व** प्रश्नांना **समान गुण.**

**प्रश्न १ ला** : विशिष्ट लेखकाच्या अभ्यासासाठी कोणकोणत्या अभ्यासपद्धतींचा वापर केला जातो, ते सांगून सर्व अभ्यासपद्धती थोडक्यात विशद करा.

**किंवा**

लेखकाची जीवनदृष्टी काळाच्या व ऐतिहासिकतेच्या पार्श्वभूमीवर तपासून पाहता येते का? ते साधार स्पष्ट करा.

**प्रश्न २ रा :** 'संहिता' या कवितासंग्रहातून  विंदा करंदीकरांच्या कवितेतील प्रयोगशीलता कशी प्रत्ययास येते, ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'विंदा करंदीकरांची कविता गांधी व मार्क्सच्या विचारांचे बोट धरून मानवी जगण्याला गवसणी घालते', या विधानाची 'संहिता' या कवितासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.

**प्रश्न ३ रा** : 'अनुभवामृताचे अर्वाचीनीकरण' या प्रस्तावनेत गो.वि.करंदीकरांची संतसाहित्यामागील व्यापक भूमिका कशी प्रत्ययास येते, ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', 'राजा लिअर', 'अनुभवामृताचे अर्वाचीनीकरण' या तीनही पुस्तकांच्या प्रस्तावनेत गो.वि. करंदीकरांची साहित्यविषयक तात्त्विक मांडणी कशी व्यक्त होते, ते विशद करा.

**प्रश्न ४ था** : खालीलपैकी **प्रत्येक गटातील एक टीप** लिहा.

अ. १. लेखकाभ्यासाची संकल्पना

२. लेखकाची जीवनदृष्टी व कलाकृती

आ. १. 'संहिता' या संग्रहातील भाषिक सौंदर्य

२. 'संहिता' या संग्रहातील गझलांचे वैशिष्टय

इ. १. 'राजा लिअर' प्रस्तावनेतील व्यापकता

२. 'अनुभवामृत अर्वाचीनीकरण' मधील संतसाहित्यातील व्यामिश्रता

**********